माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : २५/२०२१, २६/२०२१, २७/२०२१, २८/२०२१, २९/२०२१

अपिलार्थी, श्री. भास्कर भाऊरावजी येंगळे,

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा लेखापाल,
कृषी उत्पन्न बाजार समिती, भिवापूर, ता. भिवापूर, जि.नागपूर

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती, भिवापूर, ता. भिवापूर, जि.नागपूर

व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.०९.२०२२

अपीलकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०७.२०२० | १०.०८.२०२० | २९.०८.२०२० | २५.०९.२०२० |
| ३०.०६.२०२० | २९.०७.२०२० | ०५.०८.२०२० | २५.०९.२०२० |
| ३०.०६.२०२० | २९.०७.२०२० | २९.०८.२०२० | २५.०९.२०२० |
| १३.०७.२०२० | १०.०८.२०२० | २९.०८.२०२० | २५.०९.२०२० |
| १३.०७.२०२० | १०.०८.२०२० | २९.०८.२०२० | २५.०९.२०२० |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ माहिती अर्ज सादर केले असून त्यात त्यांनी खालीलप्रमाणे अनुक्रमे माहिती मागितलेली आहे.

अपील क्र.२५/२०२१ ( दि.१३.०७.२०२०) :-" माहे फेब्रुवारी२०२० ला सभापती/सचिव व संचालक उत्तर भारत अभ्यास दौ-यावर गेले होते. त्याबाबतची प्रत्येकाची खर्चाची वेगवेगळी माहिती " मागितलेली आहे.सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.०८.२०२० रोजीच्या पत्रान्वये, या काळात महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.७१/१८ (रवका.),दिनांक १४ ऑक्टोबर, २०१९ अन्वये परिपत्रकानुसार आलेल्या अर्जाची एजंटाकडून किंवा त्याच्या मार्फत शासनास करण्यात आलेल्या अर्जाची सामान्यतः दखल घेण्यात येऊ नये, अशी तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे आपला अर्ज या कार्यालयाचे स्तरावर खारीज करण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले.

अपील क्र.२६/२०२१ ( दि.३०.०६.२०२०) :-" कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूर अंतर्गत बे येथे सोयाबीन, चना खरेदीबाबतची माहिती " मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती यांनी दिनांक २९.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये, बेसूर व पांजरेपार या भागात चना खरेदीच्या व्यवहाराब माहिती समितीला नाही व सदर व्यवहार हा समितीचे मार्केट यार्ड परिसरात न झाल्याने सबब खरेदी व्यव व इतर माहिती देणे समितीला शक्य नाही, असे अपिलार्थीस कळविले.

अपील क्र.२७/२०२१ ( दि.३०.०६.२०२०) :-" कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूरच्या स्वतःच्या मालकीचे मेन रोड दुकानाचे गाळे किरायाने दिले त्याबाबतची माहिती " मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.७१/१८ (र.व का.),दिनांक १४ ऑक्टोबर, २०१९ अन्वये परिपत्रकानुसार आलेल्या अर्जाची एजंटाकडून किंवा त्याच्या मार्फत शासनास करण्यात आलेल्या अर्जाची सामान्यत: दखल घेण्यात येऊ नये. अशी तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे आपला अर्ज या कार्यालयाचे स्तरावर खारीज करण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले.

अपील क्र.२८/२०२१ ( दि.१३.०७.२०२०) :-" कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूरच्या समितीच्या आवारामध्ये आतमध्ये कुणाकुणाचे अतिक्रमण आहे, याबाबतची माहिती " मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.०८.२०२० रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.७१/१८ (र.व का.),दिनांक १४ ऑक्टोबर, २०१९ अन्वये परिपत्रकानुसार आलेल्या अर्जाची एजंटाकडून किंवा त्याच्या मार्फत शासनास करण्यात आलेल्या अर्जाची सामान्यत: दखल घेण्यात येऊ नये. अशी तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे आपला अर्ज या कार्यालयाचे स्तरावर खारीज करण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले.

अपील क्र.२९/२०२१ ( दि.१३.०७.२०२०) :-" कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूरचे सभापती विठ्ठल बापूराव राऊत यांच्याबाबत माहिती " मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.०८.२०२० रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.७१/१८ (र.व का.),दिनांक १४ ऑक्टोबर, २०१९ अन्वये परिपत्रकानुसार आलेल्या अर्जाची एजंटाकडून किंवा त्याच्या मार्फत शासनास करण्यात आलेल्या अर्जाची सामान्यत: दखल घेण्यात येऊ नये. अशी तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे आपला अर्ज या कार्यालयाचे स्तरावर खारीज करण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले.

त्यावर अपिलार्थी यांनी व्यथित होऊन दिनांक **२९.०८.२०२०, ०५.०८.२०२०,२९.०८.२०२०, २९.०८.२०२० व २९.०८.२०२०** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती दिलेली नाही" असे कारण नमूद करुन एकूण पाच प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.०९.२०२० रोजी सुनावणी घेवून, अपिलकर्ता हा कृषी उत्पन्न बाजार समितीला वरचेवर अर्ज करुन त्रास देण्याच्या उद्देशाने अर्ज सादर करीत आहे. तसेच अपीलकर्ताचा माहितीशी कोणत्याही प्रकारे संबंध नसल्याने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.७१/१८ (र.व.का.),दिनांक १४ ऑक्टोबर, २०१९ चे परिपत्रकानुसार या कार्यालयाचे स्तरावरुन अपिलार्थीचे सहाही अर्ज खारीज करण्यात येत आहे, असे आदेशित केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक ०४.०१.२०२१ रोजी "माहिती दिली नाही" असे कारण नमुद करून एकूण पाच द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १४.०९.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, श्री. विजय अमृतराव चौधरी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री. रामकृष्णा गणपतराव गोंगल उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी श्री. भाष्कर भाऊरावजी येंगळे यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूर येथील जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १३.०७.२०२० रोजी एकूण ५ माहिती अर्ज सादर करुन माहिती मागितलेली आहे. मात्र कृषी उत्पन्न बाजार समितीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो किंवा कसे, यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फार स्पेशल लिव्ह अपील (C) --- CC3596/2016 कृषी उत्पन्न बाजार समिती विरुध्द मुख्य माहिती आयुक्त आणि इतर या प्रकरणात दि. २९.०२.२०१६ रोजी स्थगिती आदेश दिलेले आहेत. सदरचे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे जोपर्यंत मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडून या विषयावर अंतिम आदेश पारीत केला जात नाही, तोपर्यंत या प्रकरणात आयोगाकडून आदेश पारीत करणे यथोचित होणार नाही. याबाबतीत मा. राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठाने श्री. बालाजी बंडे विरुध्द कृषी उत्पन्न बाजार समिती मुखेड,जि.नांदेड, अपील क्र.७०६९/२०१८ यात दिनांक ०२.०१.२०१९ रोजी याच प्रकारचा निर्णय दिलेला असल्याचा लेखी खुलासा प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आलेला आहे. ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय आल्यानंतर सदर प्रकरणात नव्याने माहिती अर्ज दाखल करुन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेऊ शकतात. वरील विवेचन लक्षात घेता, सदर पाचही व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर *नागपूर*

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १४.०९.२०२२

जावक क्रमांक 1407 दिनांक 27 FEB 2023